डॉ.पंजाबराव देशमुख विदर्भ प्रशासकीय व विकास प्रशिक्षण प्रबोधिनी, अमरावती या प्रशासकीय प्रशिक्षण संस्थेतील वसतीगृह तथा आवार व्यवस्थापक वर्ग-३ पदाची वेतनश्रेणी अवनत करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
शासन निर्णय क्र. प्रतिनि २०२६ /प्र.क्र.७७/प्रशि-४
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक : २० नोव्हेंबर, २०२६.

वाचा :-१) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र. टिआरएन -२०११/प्र.क्र.२८७/११/१२-अ, दि.१४.१०.२०१३.
२) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र. एसआरव्ही-२०११/प्र.क्र.१३७/कार्या-१२, दि.१७.१२.२०१६.
३) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र. एसआरव्ही-२०१६/प्र.क्र.५१०/कार्या.१२, दि.१६.०२.२०१८
४) शासन आदेश, सामान्य प्रशासन विभाग, क्र. प्रतिनि२०२६/प्र.क्र.७७/प्रशि-४,दि.०१.०९.२०२६.

शासन निर्णय :-

श्रीमती दिपाली रमाकांत पिंजरकर, सहायक महसूल अधिकारी (वेतनश्रेणी एस-१२: ३२०००-१०१६००) यांची संदर्भाधीन क्र.४ येथील शासन आदेशान्वये दि.०१.०९.२०२६ पासून ३ वर्षे कालावधीसाठी डॉ.पंजाबराव देशमुख विदर्भ प्रशासकीय व विकास प्रशिक्षण प्रबोधिनी, अमरावती या विभागीय प्रशासकीय प्रशिक्षण संस्थेमधील वसतीगृह तथा आवार व्यवस्थापक वर्ग-३ (वेतनश्रेणी एस-१३: ३५४००-११२४००) या पदावर प्रतिनियुक्तीने नियुक्ती केली आहे.

२. संदर्भ क्र.३ येथील शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, दिनांक १६.०२.२०१८ मधील १(ख) परिच्छेद क्र.५(अ)(४) मधील तरतुदीनुसार, डॉ.पंजाबराव देशमुख विदर्भ प्रशासकीय व विकास प्रशिक्षण प्रबोधिनी, अमरावती या प्रशासकीय प्रशिक्षण संस्थेमधील वसतीगृह तथा आवार व्यवस्थापक वर्ग-३ (वेतनश्रेणी एस-१३: ३५४००-११२४००) हे पद दिनांक ०१.०९.२०२६ पासून श्रीमती दिपाली रमाकांत पिंजरकर सदर पदावर कार्यरत असेपर्यंत वेतनश्रेणी एस-१२: ३२०००-१०१६०० या वेतनश्रेणीत अवनत करण्यास मंजूरी देण्यात येत आहे. त्यानंतर सदर पद मूळ वेतनश्रेणीत म्हणजेच एस-१३: ३५४००-११२४०० मध्ये उन्नत होईल.

३. हा शासन निर्णय वित्त विभागाने अनौपचारिक संदर्भ क्र.अनौसं ३६५/सेवा-९/२०२६ दिनांक ०५.११.२०२६ अन्वये दिलेल्या सहमतीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २०२६११२०१७३१२९२७०७ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

ANUSHRI ARVIND PARAB

Digitally signed by ANUSHRI ARVIND PARAB
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=GAD, 2.5.4.20=9CD457C3499803413F595E2A9672ABFE873725FE8CEA5F909D2E30A578CDB448, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=94114817BD726F28FA97FD6789383FFB6B7167B44B2A0A517BD03DE3D9C87038, cn=ANUSHRI ARVIND PARAB
Date: 2026.11.20 17:32:30 +05'30'

(अनुश्री परब)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. संचालक, डॉ. पंजाबराव देशमुख विदर्भ प्रशासकीय व विकास प्रशिक्षण प्रबोधिनी, अमरावती

२. विभागीय आयुक्त, अमरावती विभाग, अमरावती
३. जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड.
४. उप सचिव (आस्था-७), महसुल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
५. श्रीमती दिपाली रमाकांत पिंजरकर, वसतीगृह तथा आवार व्यवस्थापक वर्ग-३, डॉ.पंजाबराव देशमुख विदर्भ प्रशासकीय व विकास प्रशिक्षण प्रबोधिनी, अमरावती
६. जिल्हा कोषागार अधिकारी, अमरावती.
७. सहायक लेखाधिकारी, डॉ.पंजाबराव देशमुख विदर्भ प्रशासकीय व विकास प्रशिक्षण प्रबोधिनी,अमरावती
८. वित्त विभाग, कार्यासन/सेवा-९,मंत्रालय, मुंबई-३२.
९. निवडनस्ती/प्रशि-४